cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१३६ | बुधवार दि.०५ ऑगस्ट २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## पद्मश्री डॉ.डी.वाय.पाटील यांचे कोल्हापुरात निधन

कोल्हापूर । प्रतिनिधी



शिक्षण, आरोग्य आणि समाजकारण अशा विविध क्षेत्रांत आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवणारे ऋषीतुल्य व्यक्तिमत्त्व, त्रिपुरा, बिहार आणि पश्चिम बंगालचे माजी राज्यपाल पद्मश्री डॉ. ज्ञानदेव यशवंत पाटील तथा डॉ. डी. वाय. पाटील (वय ९१) यांचे मंगळवारी सकाळी कोल्हापुरात निधन झाले. त्यांच्या निधनामुळे केवळ महाराष्ट्रच नव्हे, तर देशातील शैक्षणिक क्षेत्रावर शोककळा पसरली आहे.

साध्या शेतकरी कुटुंबातून आपला प्रवास सुरू करून राज्यपालपदापर्यंत पोहोचलेल्या डॉ. डी. वाय. पाटील दादा यांच्या निधनाने एका महान पर्वाचा ▶▶ पान २ वर

# शेतकऱ्यांच्या अपघात सुरक्षा योजनेला तीन वर्षांची मुदतवाढ

## भूमिहीन शेतमजूर आणि महिला शेतकऱ्यांचाही समावेश

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील शेतकरी आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी महत्त्वाची दिलासादायक बातमी आहे. राज्य सरकारने गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना आणखी तीन वर्षे सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. यासोबतच या योजनेची व्याप्ती वाढवत भूमिहीन शेतमजूर आणि महिला शेतकऱ्यांचा समावेश करण्यासही मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी (दि. ४) झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला.



राज्यात शेती करताना किंवा इतर कोणत्याही अपघातात शेतकऱ्यांचा मृत्यू झाल्यास किंवा कायमस्वरूपी अपंगत्व आल्यास संबंधित शेतकरी अथवा त्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत देण्यासाठी ही योजना राबविण्यात येते. २०१९ पासून सुरू असलेल्या या योजनेमुळे हजारो शेतकरी कुटुंबांना आर्थिक आधार मिळाला आहे. २०२३ मध्ये या योजनेला दिवंगत माजी केंद्रीय मंत्री गोपीनाथ मुंडे यांचे नाव देण्यात आले होते. आता या योजनेला आणखी तीन वर्षांची मुदतवाढ मिळाल्याने शेतकरी कुटुंबांना संरक्षणाची हमी कायम राहणार आहे. राज्य सरकारने अलीकडेच महिलांना ▶▶ पान २ वर



## एलपीजी गॅस ई-केवायसीची अंतिम मुदत १५ ऑगस्ट

मुंबई । प्रतिनिधी

देशभरातील घरगुती एलपीजल गॅस ग्राहकांसाठी महत्त्वाची सूचना जारी करण्यात आली आहे. गॅस कंपन्यांनी सर्व ग्राहकांना १५ ऑगस्टपूर्वी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन केले आहे. वेळेत ई-केवायसी न केल्यास घरगुती गॅस सिलेंडरऐवजी व्यावसायिक दराने सिलेंडर घ्यावा लागू शकतो किंवा रिफिल बुकिंगमध्ये अडचणी येण्याची शक्यता आहे. गॅस कंपन्यांच्या माहितीनुसार, ▶▶ पान २ वर

## महिला उपमुख्यमंत्र्यांचा द्वेष कशासाठी?–धनंजय मुंडे



मुंबई । प्रतिनिधी

**राज्याच्या पहिल्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. सुनेत्रवहिनी अजितदादा पवार यांच्या वरती टीका करणाऱ्या विरोधकांना आ. धनंजय मुंडे यांनी मंगळवारी मुंबई येथे पत्रकारांशी संवाद साधत उत्तर दिले. सुनेत्रा वहिनी अजित दादा पवार यांच्यावरती टीका करून एका महिला उपमुख्यमंत्र्याबद्दल काँग्रेसला किती द्वेष आहे हे काँग्रेसने दाखवून दिले आहे, असे धनंजय मुंडे म्हणाले.**

स्वर्गीय अजित दादांच्या अकाली निधनानंतर ओढवलेल्या दुःखाच्या प्रसंगातून स्वतःला सावरत सुनेत्रा वहिनींनी अजितदादांची जागा घेतली आणि महाराष्ट्रातील मायबाप जनतेच्या प्रति स्वर्गीय अजित दादांचे अपुरे स्वप्न पूर्ण करण्याचे ध्येय उराशी बाळगून त्या दिवस रात्र काम करू लागल्या; त्यांच्यावर अशा प्रकारची टीका करण्यापूर्वी काँग्रेसने आपला इतिहास तपासायला हवा होता. देशाच्या माजी पंतप्रधान स्वर्गीय इंदिरा गांधी यांनाही तत्कालीन विरोधकांनी गुंगी गुडिया म्हणून हिणवले होते, मात्र त्यांनी आपल्या कर्तृत्वातून स्वतःला ▶▶ पान २ वर



## अनिल देशमुखांच्या विरोधात खटला चालवण्यास ईडीला मंजुरी

मुंबई । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे नेते आणि राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्या अडचणींमध्ये वाढ झाली आहे. बहुचर्चित १०० कोटी रुपयांच्या खंडणी वसुली आणि मनी लॉंड्रिंग प्रकरणामध्ये अनिल देशमुख ▶▶ पान २ वर










cmyk

अग्रलेख

# बँकीपूरचा निकाल : सत्ताधाऱ्यांना चपराकच !

भारतीय राजकारणात सत्तेला एक विचित्र आजार जडतो. सुरुवातीला तो आत्मविश्वास असतो, नंतर तो अभिमान बनतो आणि शेवटी त्याचं रूपांतर ''जनतेला अजून काहीच समजत नाही'' अशा मानसिकतेत होतं. मग प्रत्येक टीका म्हणजे कटकारस्थान, प्रत्येक आंदोलन म्हणजे राजकारण, प्रत्येक प्रश्न म्हणजे राष्ट्रविरोध, आणि प्रत्येक पराभव म्हणजे अपघात. पण मतपेटीला ना प्रवक्ते असतात, ना टीव्ही डिबेट. ती फक्त शांतपणे निकाल देते.

बँकीपूरमध्ये प्रशांत किशोर जिंकले. एक जागा. एवढंच. पण कधी कधी इतिहास एका जागेपासून सुरू होतो. कारण मतदारांनी निकाल देताना विचारलं नाही की कोणाकडे सर्वात मोठी जाहिरात मोहीम आहे. त्यांनी विचारलं आमच्या आयुष्यात काय बदललं? दर काही महिन्यांनी एखाद्या प्रकल्पाचं उद्घाटन होतं. त्याच प्रकल्पाचं पुन्हा उद्घाटन होतं. मग विस्ताराचं उद्घाटन होतं. कधी कधी वाटतं, प्रकल्प पूर्ण होण्यापेक्षा उद्घाटनांचे फोटोच जास्त तयार होतात. नागरिक मात्र अजूनही विचारत आहेत''फीत कापली, आता काम कधी पूर्ण होणार?''सरकारवर टीका झाली की उत्तर तयार असतं''देश इतका पुढे गेला आहे.'' प्रश्न असा आहे की देश पुढे गेला, पण सामान्य माणूसही तितकाच पुढे गेला का? बेरोजगार तरुण, भरतीची वाट पाहणारे उमेदवार, परीक्षा व्यवस्थेबद्दल प्रश्न विचारणारे विद्यार्थी, महागाईचा सामना करणारा मध्यमवर्गयांच्या प्रश्नांना 'नॅरेटिव्ह' म्हणून नाकारलं तर प्रश्न संपत नाहीत. राजकारणात एक जुनी म्हण आहे. लोक घोषणा ऐकतात, पण मतदान अनुभवावर करतात. जर मतदारांना वाटू लागलं की भाषणं वाढत आहेत आणि उत्तरं कमी होत आहेत, तर कोणताही पक्ष असो, त्याच्यासाठी तो इशारा असतो. याचा अर्थ भाजपचा काळ संपला आहे का? आज तसं ठामपणे म्हणता येणार नाही. पण इतकं मात्र नक्की म्हणता येईल की कोणत्याही सत्तेसाठी सर्वात धोकादायक क्षण तो नसतो जेव्हा विरोधक बोलू लागतात; तो असतो जेव्हा स्वतःचे समर्थकही प्रश्न विचारू लागतात. लोकशाहीत सत्ता ही कायमस्वरूपी मालकी नसते; ती जनतेकडून घेतलेली मुदत असते. आणि प्रत्येक मुदतीच्या शेवटी एकच परीक्षा असतेघोषणांची नाही, कामगिरीची. बँकीपूरचा निकाल कदाचित त्या परीक्षेची पहिली घंटा असेल किंवा कदाचित फक्त एक स्थानिक संदेश. अंतिम उत्तर २०२९ मध्ये मतदार देतील.

# कल्याण काळदाते यांचा महसूल उपक्रमातील उत्कृष्ट कार्याबद्दल सन्मान

## जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र

**मंठा । प्रतिनिधी**

**मंठा तहसीलचे नायब तहसीलदार कल्याण काळदाते यांनी जिल्ह्यामध्ये सन २०२५ – २६ या वर्षात महसूल उपक्रमात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते महसूल दिनी विशेष सन्मान करण्यात आला.**

श्री काळदाते हे तहसील कार्यालय मंठा येथे नायब तहसीलदार महसूल १ या पदावर कार्यरत आहेत. त्यांनी उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड आणि तहसीलदार सुमन मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील शिरपूर गावात १०० लोकांचे अतिक्रमण नियमानुकूल केले त्यात महत्त्वाची भूमिका बजावली, लँड बँक काम वेगाने शंभर टक्के पूर्ण करून घेतले, या उपक्रमात त्यांनी जालना जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळविला, महाराजस्व अभियान टप्पा क्रमांक १ व २ मध्ये उत्कृष्ट नियोजन आणि लाभार्थी यांना लाभ वाटप केले, जालना मित्र पोर्टल व आपले सरकार केंद्र यांच्या माध्यमातून घरपोच दाखले वितरण केले, महापालिका जालना निवडणूक मध्ये नामनिर्देशन, टपाली मतपत्रिका व रिपोर्टिंग टीमचे नोडल अधिकारी म्हणून उल्लेखनीय काम केले, सप्टेंबर २०२५ मधील संभाव्य पूरस्थिती मधील कामे व पूर्व तयारी तसेच जलद गतीने रस्ते प्रकरणे निकाली काढली. त्यांच्या या महसूल



विभागातील उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन महसूल दिनी जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झालेल्या विशेष कार्यक्रमात श्री काळदाते यांचा गौरव करण्यात आला. अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सहकार्य आणि कुटुंबाचा खंबीर पाठिंबा असल्याशिवाय प्रशासकीय कामकाज करणे अशक्य आहे असे मत नायब तहसीलदार कल्याण काळदाते यांनी व्यक्त केले.

# पद्मश्री डॉ.डी.वाय.पाटील यांचे निधन; ना. पंकजाताई मुंडे यांनी वाहिली भावपूर्ण श्रध्दांजली

## शिक्षण क्षेत्रात पोकळी; कुटुंबातील ज्येष्ठ सदस्य हरवल्याची व्यक्त केली भावना

**मुंबई । प्रतिनिधी**

शिक्षण, आरोग्य आणि समाजकारण अशा विविध क्षेत्रांत आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवणारे व्यक्तिमत्त्व, त्रिपुरा, बिहार आणि पश्चिम बंगालचे माजी राज्यपाल पद्मश्री डॉ. डी.वाय. पाटील यांचे आज कोल्हापुरात निधन झाले. त्यांच्या निधनामुळे केवळ महाराष्ट्रच नव्हे, तर देशातील शैक्षणिक आणि राजकीय वर्तुळात मोठी शोककळा पसरली आहे. त्यांच्या निधनाने कुटुंबातील जेष्ठ सदस्य हरवला असल्याची भावना राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी व्यक्त केली आहे.



डॉ. डी.वाय. पाटील हे आमच्यासाठी कुटुंबातील जेष्ठ मार्गदर्शक होते. मुंडे साहेबांशी त्यांचा विशेष स्नेह होता. शिक्षण, आरोग्य आणि समाजकारण अशा विविध क्षेत्रांत त्यांनी निर्माण केलेल्या व्यवस्था हे आदर्शवत आहे. शिक्षण आणि समाजसेवेतील अतुलनीय योगदानाबद्दल भारत सरकारने त्यांना 'पद्मश्री' या पुरस्काराने सन्मानित केले होते. त्यांच्या निधनाने केवळ महाराष्ट्रच नव्हे, तर देशातील शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्राचे मोठे नुकसान झाले आहे अशा शब्दांत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करत पाटील कुटुंबाला या दुःखातून सावरण्याची शक्ती इश्वराने द्यावी अशी प्रार्थना पंकजाताई मुंडे यांनी केली.

# ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या लवकरच मार्गी लागणार; ग्रामविकास मंत्र्यांचे आश्वासन

**पाटोदा । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेच्या शिष्टमंडळाने ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांची मंत्रालयातील दालनात भेट घेऊन ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांबाबत सविस्तर चर्चा केली. या बैठकीत १० टक्के भरती प्रक्रिया आणि ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या किमान वेतनवाढीचा मुद्दा प्रामुख्याने उपस्थित करण्यात आला.**

ही बैठक आमदार दादा कदम आणि आमदार सुरेश अण्णा धस यांच्या शिफारशीनुसार आयोजित करण्यात आली होती. यावेळी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर सकारात्मक भूमिका घेत लवकरात लवकर निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. बैठकीस बीड जिल्हाध्यक्ष अमोल तुपे, जिल्हा सचिव सुंदर माने, सहसचिव गणेश भांडवले, उपाध्यक्ष संजय काकडे, मार्गदर्शक तुकाराम धस, कोषाध्यक्ष सोमेश्वर येवले यांच्यासह केज तालुकाध्यक्ष गणेश चोपडे, बीड तालुकाध्यक्ष अंगद हाडोळे, पाटोदा तालुकाध्यक्ष शंकर झुनगुरे, आंबेजोगाई तालुकाध्यक्ष विजय खरात, माजलगाव तालुकाध्यक्ष रियाज शेख, गेवराई तालुकाध्यक्ष गणेश भांडवले, शिरूर तालुकाध्यक्ष महादेव नागरगोजे, आष्टीचे दत्ताभाऊ देसाई, अण्णासाहेब बादाडे तसेच सातारा जिल्हाध्यक्ष सचिन घाडगे आदी पदाधिकारी उपस्थित होते. राज्यातील सुमारे ६० हजार ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या रखडलेल्या मागण्या लवकरच पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन मंत्री जयकुमार गोरे यांनी दिल्याने राज्यभरातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांमध्ये समाधान आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# पिंपळवंडी येथील श्री स्वामी अमृत भारती माध्य व उच्च माध्यमिक विद्यालयात शालेय गणवेश वाटप व गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा उत्साहात साजरा

## महंत महादेवानंद भारती महाराज, परमेश्वर येवले,जयदत्त धस आदी मान्यवरांच्या हस्ते गुणवंत सत्कारीत

**पिंपळवंडी । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील श्री स्वामी अमृत भारती माध्य व उच्च माध्यमिक विद्यालय येथे प्रतिवर्षाप्रमाणे (वर्ष २६ वे) संत निवृत्तीनाथ महाराज विश्वस्त मंडळ व श्री.गंगाभारती महाराज शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या संयुक्त विद्यामाने शनिवार दि.१ ऑगस्ट २०२६ रोजी सन २०२५–२६ मधील विद्यालयातील शैक्षणिक,क्रीडा व विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केलेल्या यशस्वी गुणवंत विद्यार्थ्यांचा उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानपूर्वक गौरव करण्यात आला व इयत्ता ५ वी ते ८ वीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत शालेय गणेश वाटपाचा कार्यक्रम झाला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक तथा गुरुवर्य महंत १००८ ह.भ.प. महादेवानंद भारती महाराज हे होते.तर व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक परमेश्वर येवले,युवा नेते जयदत्त भैय्या धस, भाऊसाहेब आण्णा भवर,ह.भ.प. शिवानंद भारती महाराज तसेच भागवत येवले,उद्धव शेठ पवार,



उपसरपंच दादासाहेब पवार आणि जोगदंड सर,ढास महाराज, रावसाहेब भनगे,भागवत खरमाटे,बाजीराव नाकाडे,दत्तात्रय सांगळे सर,लोणकर,अर्जुन खामकर,शिंदे मॅनेजर,शिवाजी पाटील,पीएसआय माने,दादा धनवडे,बंडू अण्णा पवार,घोडके साहेब,बंड साहेब,राजाभाऊ तांबे, दिनकर तांबे, मुख्याध्यापक ए.एम. पवार सर यांची उपस्थिती होती. सन २०२५–२६ शैक्षणिक वर्षाचा आढावा मुख्याध्यापक पवार यांनी सांगितला.याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून उद्योजक परमेश्वर येवले इंदौर यांच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना छत्र्या वाटप करण्यात आल्या. यावेळी महंत महादेवानंद भारती महाराज यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शनपर भाषणातून विद्यार्थ्यांनी खूप शिकले पाहिजे, शिक्षणानेच माणूस मोठा होतो. विद्यार्थ्यांनी अंगी जिद्द बाळगून चिकाटीने अभ्यास करून मी जीवनात काहीतरी करीन हे स्वप्न बाळगून उच्च पदाचे शिखर गाठण्याचे ध्येय समोर ठेवावे हा संदेश देत प्रत्येकानी आई–वडिलांची सेवा करावी. पालकांनी भावी पिढीला उच्च शिक्षण द्यावे.शेतात झाडे लावून त्यांची जोपासना करण्याचे सविस्तर मार्गदर्शन करून मोबाईलचा चांगल्या कामासाठी उपयोग करावा असा मौलिक सल्ला दिला.जयदत्त धस यांनी गुणवंताचा सत्कार व गणवेश वाटपाचा गेल्या अनेक वर्षापासून राबवित असलेल्या उपक्रमाचे तसेच शिक्षक व विद्यार्थ्यांचे कौतुक केले.तसेच ते पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांना या विद्यालयात आधुनिक पद्धतीने दर्जेदार शिक्षण दिले जात आहे.या ठिकाणी कॉपीमुक्त परीक्षा होऊन विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.या परिसरातील अनेक शाळेची गुणवत्ता चांगली असल्याने गुणवंत विद्यार्थ्यांची रत्नांची खाण घडविण्याचे कार्य या ठिकाणी होत आहे,असे मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमातून खामकर,पाटील साहेब, ह.भ.प.शिवानंद भारती महाराज, घोडके सर, माने साहेब, लोणकर आदींनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीच्या शुभेच्छा देऊन विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन केले.आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक प्रताप पवार सर यांचा या निमित्त मान्यवरांच्या शुभहस्ते श्रीफळ देऊन शाल,पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाला इंजि.डी.एस.पवार, अंगद भोंडवे,नखाते सर, आरसुळ सर, अशोक तात्या पवार, सुरेश पवार,जालिंदर पवार, महादेव नाकाडे, नितीन पवार, आसराजी पवार, बाबासाहेब जाधव, पत्रकार बबनराव उकांडे, भाऊसाहेब पवार, के.टी. पवार आदिसह परिसरातील ग्रामस्थ, पालक, आजी–माजी विद्यार्थी, शिक्षणप्रेमी व सर्व क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रताप पवार सर यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी विद्यालयाच्या सर्व शिक्षकांनी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात; गरजू विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप

**माजलगाव । प्रतिनिधी**

**क्रांतीसूर्य लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्ताने माजलगाव शहरात सामाजिक बांधीलकी जपणाऱ्या विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.शहरातील प्रमुख डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे भव्य साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा अर्धकृती पुतळा व मनमोहक देखावा दिवसभर अभिवादनासाठी ठेवण्यात आला होता,अत्यंत उत्साही आणि प्रेरणादायी वातावरणात हा सोहळा पार पडला.शालेय विद्यार्थ्यांना गणवेश वाटप जयंतीचे औचित्य साधून सामाजिक जाणिवेतून शालेय विद्यार्थ्यांना मोफत गणवेशाचे वाटप करण्यात आले. शिक्षणापासून कोणीही वंचित राहू नये आणि विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढावा,या उद्देशाने हा स्तुत्य उपक्रम दरवर्षी राबविण्यात येतो तसा याही वर्षी करण्यात आला. गणवेश मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद ओसंडून वाहत होता. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते या गरजू विद्यार्थ्यांना गणवेश सुपूर्द करण्यात आले.**

आंबेडकर चौकात निळा ध्वज फडकवलायानंतर शहरातील मुख्य केंद्रबिंदू असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे 'गगनभेदी घोषणांच्या जयघोषात निळ्या ध्वजाचे सन्मानपूर्वक ध्वजारोहण करण्यात आले. हा सोहळा पाहण्यासाठी समाजबांधवांनी मोठी गर्दी केली होती.अण्णाभाऊंच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प यावेळी सर्वांनी सामूहिकरीत्या केला.या कार्यक्रमाला शहरातील आझाद क्रांती सेनाचे प्रमुख राजेश घोडे, माजी नगरसेवक शिवाजी सुतार,अभय होके पाटील,डॉ. ज्ञानेश्वर गिलभीले,डॉ. दिनकर मस्के,अरुण राऊत,माजी नागराध्यक्ष अशोक तिडके,अशोक कदम,गुड्डू पटेल यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आले. तसेच या कार्यक्रम चे अध्यक्ष बाबासाहेब ढगे यांच्या हस्ते निळ्या ध्वजाचे ध्वजारोहन करण्यात आले या वेळी जेष्ठ नेते दयानंद स्वामी यांची प्रमुख उपस्थिती होती.तसेंच या सोहळ्यास कचरु कांबळे,भरत मिसाळ,अकबर शेख,नुमान चाऊस,महादेव कांबळे,अप्पा भरस्कार,भरत जाधव,शाहीर साळवे व पत्रकार या जयंती सोहळ्यात उपस्थित होते. अनेक प्रतिष्ठित नागरिक, सामाजिक कार्यकर्ते,तरुण मंडळी आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जयंती उत्सव समितीचे अशोक ढगे,कृष्णा मुजमुले,किसन भिसे,तुकाराम जाधव,राहुल गायकवाड,विनोद ढगे,नवनाथ लोखंडे,अनिल ढगे,अतुल अलझेंडे,आकाश हातागले,किशोर ढगे,सौरभ कांबळे,बाळू ढगे, यांनी अत्यंत परिश्रम घेतले.अत्यंत शिस्तबद्ध आणि उत्साही वातावरणात संपन्न झालेल्या या उपक्रमाचे माजलगाव शहरात सर्व स्तरांतून भरभरून कौतुक होत आहे.




# पान १ वरून...

पान १ वरून...

### एलपीजी गॅस ई–केवायसीची

ई–केवायसी मोहिमेचा उद्देश प्रत्येक गॅस कनेक्शनची पडताळणी करणे, बनावट किंवा अनधिकृत कनेक्शन रोखणे आणि सरकारी अनुदान योग्य लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवणे हा आहे. त्यामुळे सर्व वितरकांना १५ ऑगस्टपर्यंत जास्तीत जास्त ग्राहकांची ई–केवायसी पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सध्या अनेक भागांत मोठ्या संख्येने ग्राहकांनी ई–केवायसी केलेली नसल्यामुळे गॅस एजन्सीकडून फोन, एसएमएस आणि प्रत्यक्ष संपर्क करून ग्राहकांना प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन केले जात आहे. काही ग्राहकांना रिफिल बुकिंग ब्लॉक होण्याबाबतचे संदेशही मिळू लागल्याची माहिती समोर आली आहे. ग्राहक आपल्या जवळच्या गॅस एजन्सीला भेट देऊन किंवा संबंधित गॅस कंपनीच्या अधिकृत ऑनलाइन सुविधेद्वारे ई–केवायसी पूर्ण करू शकतात. यासाठी आधार कार्ड, नोंदणीकृत मोबाईल क्रमांक आणि आवश्यक ओळखपत्रांची पडताळणी केली जाते. प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर गॅस कनेक्शनची माहिती अद्ययावत केली जाते. गॅस कंपन्या आणि वितरकांनी सर्व ग्राहकांना १५ ऑगस्टपूर्वी ई–केवायसी पूर्ण करून भविष्यातील अडचणी टाळण्याचे आवाहन केले आहे.

----------

### शेतकऱ्यांच्या अपघात सुरक्षा योजनेला

अधिकृतपणे शेतकऱ्यांचा दर्जा दिला आहे. त्या निर्णयाच्या अनुषंगाने आता महिला शेतकऱ्यांनाही या योजनेचा लाभ मिळणार आहे. तसेच शेतीत प्रत्यक्ष काम करणाऱ्या पण स्वतःच्या नावावर जमीन नसलेल्या भूमिहीन शेतमजुरांचाही या योजनेत समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे शेती क्षेत्रातील मोठा घटक प्रथमच या संरक्षणात्मक योजनेच्या कक्षेत येणार आहे. सरकारच्या मते, या निर्णयामुळे अपघातग्रस्त शेतकरी कुटुंबांना आर्थिक आधार मिळण्याबरोबरच ग्रामीण भागातील महिला आणि भूमिहीन शेतमजुरांना सामाजिक सुरक्षा कवच उपलब्ध होईल. महिला सक्षमीकरणाला चालना मिळण्यासही या निर्णयाची मदत होणार असल्याचा दावा सरकारने केला आहे.ङ्घ्या योजनेअंतर्गत शेतीशी संबंधित काम करताना किंवा इतर अपघातामुळे मृत्यू अथवा अपंगत्व आल्यास शासनाकडून सानुग्रह आर्थिक मदत दिली जाते. त्यामुळे अपघातानंतर कुटुंबावर ओढवणाऱ्या आर्थिक संकटाचा काही प्रमाणात भार कमी होण्यास मदत होते. योजनेचा लाभ मिळविण्यासाठी संबंधित प्रकरणांची नोंद आणि आवश्यक कागदपत्रांच्या आधारे प्रक्रिया पूर्ण केली जाते. दरम्यान, मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत एकूण सात महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. कृषी, जलसंपदा, ऊर्जा आणि सामान्य प्रशासन विभागाशी संबंधित विविध प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. त्यापैकी गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेला मुदतवाढ आणि लाभार्थींचा विस्तार हा निर्णय विशेष महत्त्वाचा मानला जात आहे.

-------------

### पद्मश्री डॉ.डी.वाय.पाटील

अंत झाला आहे. डॉ. डी. वाय. पाटील यांच्या यांच्या पश्चात मुलगा डॉ. संजय डी. वाय. पाटील, माजी गृहराज्यमंत्री सतेज पाटील, विजय पाटील, डॉ. अजिंक्य पाटील, मुलगी डॉ. नंदिता पालशेतकर आणि नातू आमदार ऋतुराज पाटील यांच्यासह मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राने एक मार्गदर्शक आणि आधारस्तंभ गमावला आहे. कोरोना काळानंतर कसबा बावडा येथील यशवंत निवास येथे डॉ. डी. वाय. पाटील वास्तव्यास होते. गेल्या सहा महिन्यांपासून त्यांची प्रकृती हळूहळू खालावत चालली होती. त्यामुळे घरातूनच त्यांच्यावर उपचार सुरू होते. अगदी २० दिवसांपूर्वीच त्यांना हृदयविकाराचा झटका देखील आला होता. मात्र त्यातून ते सावरले होते. डॉ. डी. वाय. पाटील यांच्यावर सायंकाळी ५ वाजता डॉ. डी. वाय. पाटील मेडिकल कॉलेज (लाईन बाजार, कसबा बावडा) च्या प्रांगणात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

-------------

### महिला उपमुख्यमंत्र्यांचा

सिद्ध केले. त्याचप्रमाणे किंबहुना त्याहीपेक्षा पुढे जाऊन आदरणीय सुनेत्रा वहिनी आगामी काळामध्ये जनतेच्या व्यापक हिताचे काम करतील, असा आम्हाला विश्वास आहे, असेही ते पुढे बोलताना म्हणाले. दरम्यान, बीड जिल्हा दौऱ्यातील मीडिया ट्रायल संदर्भात बोलताना धनंजय मुंडे म्हणाले की, खरे तर दोन दिवसाच्या बीड जिल्हा दौऱ्यावर सुनेत्रा वहिनी आल्या, तेव्हा पहिल्या दिवशी सायंकाळी पाच वाजल्यापासून रात्री अकरा वाजेपर्यंत सतत बैठका आणि जनतेची कामे करत होत्या. त्यानंतर दुसऱ्या दिवशी स्वर्गीय अजितदादांप्रमाणे सकाळी सात वाजल्यापासून त्या शासकीय कामकाज आणि बैठकांमध्ये होत्या. जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीदरम्यान सर्व माध्यम प्रतिनिधींना प्रशासनाच्या वतीने पत्र देऊन जिल्हा नियोजन समितीच्या बैठकी संदर्भात सुनेत्रा वहिनी निवेदन करणारा असून पत्रकार परिषद नाही, असे स्पष्ट लेखी पत्र देण्यात आलेले होते, ते पत्रही श्री मुंडे यांनी माध्यमांना दाखवले. स्वर्गीय अजित दादांच्या माघारी प्रथमच बीड जिल्ह्यात आलेल्या वहिनींना काही ठराविक प्रतिनिधींनी प्रश्न विचारायला सुरुवात केल्यानंतर मी ही पत्रकार परिषद नसल्याचे सांगितले, मात्र त्याचा विपर्यास करण्यात आला आणि त्यावरून काँग्रेस टीका करत आहे हे केविलवाणे आहे. त्याचबरोबर जनता संवाद दरम्यान काही लोक एकाच वेळी मोठमोठ्याने बोलत असल्याने त्यांना हळू बोला व शांतपणे आपले म्हणणे मांडा, असे सांगितले मात्र त्याचाही विपर्यास मी शेतकऱ्यांना दम दिला, असा केला गेला, हे खेदजनक आहे, असेही ते म्हणाले. मी दोन दिवसांपूर्वीच बीड मधील माध्यमकर्मींच्या संदर्भात एक ट्विट करत सांगितले होते की ९५ टक्के पेक्षा अधिक पत्रकार हे अत्यंत सुज्ञ असून खूप चांगले काम करतात, आम्हाला त्यांचा आदर आहे, मात्र काही ठराविक पत्रकारांना जिल्ह्यातले वातावरण बिघडवायचे आहे. जिल्ह्यात सलोख्याचे वातावरण होऊ नये यासाठी ते सातत्याने ते प्रयत्नशील असतात, त्याचा माझ्यासह अनेकांना फटका बसलेला आहे. सततची मीडिया ट्रायल आणि खोट्या बातम्यांनी मी अक्षरशः वैतागून गेलो आहे. मागील अनेक दिवसांपासून माध्यमांवर बोलणे देखील टाळतो आहे. मात्र सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये केलेल्या भाषणांतून देखील माझ्या शब्दांचा विपर्यास करून माझ्या बदनामीची संधी शोधण्यात काहीजण धन्यता मानत आहेत, एका माणसाने सहन तरी किती करावे? मी खूप लहान माणूस आहे, माझी एवढी काय भीती आहे तुम्हाला? असा उद्विग्न प्रश्न त्यांनी उपस्थित केला. विद्यार्थ्यांच्या आंदोलनात राजकीय संधी शोधणाऱ्या काँग्रेसने झारखंड मध्ये झालेल्या पेपरफुटीवर एखादे आंदोलन करावे; मात्र त्यावर ते तसूभरही बोलणार नाहीत. काँग्रेसने सुनेत्रा वहिनींचा द्वेष करण्यापेक्षा राज्यात आपली जी वाताहत झाली आहे, त्यावर आता लक्ष केंद्रित करावे, असा टोलाही मुंडे यांनी लगावला. माझ्यावर विरोधकांनी मागील काळात अनेक आरोप केले, अगदी उच्च न्यायालयात गेले मात्र न्याय देवतेने माझ्या बाजूने निकाल दिला आणि याचिकाकर्त्यांना दंड लावला, तोंडघशी पडले. मात्र माध्यमे त्या खोटे आरोप करणाऱ्यांना एक प्रश्न विचारत नाहीत, असे का? असाही सवाल त्यांनी उपस्थित केला. राजकीय भूमिकांवर टीका जरूर करावी मात्र माझ्या मातीची बदनामी आता सहन करणार नाही, असेही ते शेवटी ते म्हणाले.

-------------

### अनिल देशमुखांच्या विरोधात

यांच्यावर खटला चालवण्यासाठी अंमलबजावणी संचालनालयाला (ईडी) राज्यपालांची अधिकृत मंजुरी मिळाली आहे. ईडीने यासंदर्भातील माहिती आणि राज्यपालांच्या मंजुरीचे पत्र मंगळवारी (दि. ४) विशेष न्यायालयात सादर केले. विशेष सरकारी वकील सुनील गोन्साल्व्हिस यांनी न्यायालयात राज्यपालांचे मंजुरीपत्र सादर करत या घडामोडीची माहिती दिली. राज्यपालांनी २१ मे २०२६ रोजीच हा खटला चालवण्यास मंजुरी दिल्याचे ईडीतर्फे न्यायालयात सांगण्यात आले. राज्यपालांच्या या मंजुरीमुळे आता अनिल देशमुख यांच्याविरोधात मनी लाँड्रिंग आणि वसुली प्रकरणी रीतसर खटल्याचा मार्ग मोकळा झाला आहे. २०२१ मध्ये अनिल देशमुख राज्याचे गृहमंत्री होते. यावेळी त्यांच्यावर अधिकाराचा गैरवापर केल्याचा आरोप झाला होता. मुंबईचे तत्कालीन पोलीस आयुक्त परमबीर सिंग यांनी देशमुखांवर अत्यंत गंभीर आरोप केले होते. गृहमंत्री असताना देशमुखांनी पोलीस अधिकारी सचिन वाझे आणि इतर अधिकाऱ्यांना मुंबईतील बार आणि रेस्टॉरंटमधून दरमहा १०० कोटी रुपये वसूल करण्याचे निर्देश दिल्याचा खळबळजनक दावा परमबीर सिंग यांनी केला होता. परमबीर सिंग यांच्या आरोपांनंतर या प्रकरणात सीबीआय आणि ईडीने चौकशी सुरू केली होती. मनी लाँड्रिंगच्या मुद्द्यावरून ईडीने अनिल देशमुख यांना अटक केली होती. या प्रकरणात देशमुखांना दीर्घकाळ कारावासही भोगावा लागला होता. सध्या ते जामिनावर बाहेर आहेत. आता गृहमंत्रीपदाच्या कार्यकाळातील या कथित गैरव्यवहाराप्रकरणी लोकसेवकावर खटला चालवण्यासाठी आवश्यक असणारी राज्यपालांची मंजुरी आता ईडीला प्राप्त झाल्याने या प्रकरणाला वेग आला आहे. त्यामुळे आगामी काळात या खटल्याच्या निमित्ताने न्यायालयात कोणत्या महत्त्वाच्या घडामोडी घडतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार, दि. ०५ ऑगस्ट २०२६
३

## संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्याचे वाटप



माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शुक्ल तीर्थ लिंबगाव येथे मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त दि ०३ ऑगस्ट सोमवार रोजी शाळेतील सर्व विध्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

यावेळी गावातील प्रमुख उपस्थिती कृष्णा थावरे (सरपंच ), दादाराव चव्हाण, अजय चव्हाण, गणेश चव्हाण, सुखदेव चव्हाण, नवनाथ खडुळ, प्रदीप चव्हाण, सुखदेव बाणाईत, अनंत चव्हाण इ. मान्यवर यांच्या हस्ते साहित्य वाटप करण्यात आले.शुक्लतिर्थ लिमगाव येथील शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे उदार हस्ते वाटप करणाऱ्या सर्व दात्यांचे शाळेचे मुख्याध्यापक यांनी आभार मानून मराठा संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त दिलेले हे शालेय साहित्य केवळ वस्तू नसून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला मिळालेली प्रेरणा आणि प्रोत्साहन आहे.आपल्या या सहकार्यामुळे अनेक विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला आहे आणि त्यांचा शिक्षणाचा प्रवास अधिक सुलभ होणार असल्याची भावना शाळेतील अनेक शिक्षकांनी यावेळी व्यक्त केली.तसेच आपली सामाजिक बांधिलकी, विद्यार्थ्यांप्रती असलेले प्रेम आणि शिक्षणासाठी दिलेले योगदान निश्चितच कौतुकास्पद आहे. आपण भविष्यातही अशाच प्रकारे आपण विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभे राहाल, अशी आम्हाला आशा असल्याचे प्रतिपादन शुक्ल तिर्थ लिमगावचे सरपंच कृष्णा थावरे यांनी केले आहे.

## भाजपाला धक्का, नगरसेवक वाघचौरे यांच्या निवडीला स्थगिती देण्यास न्यायालयाचा नकार

### डॉ. क्षीरसागर गटाचा अर्ज न्यायालयाने फेटाळला

बीड । प्रतिनिधी

नगरपालिकेचे स्विकृत नगरसेवक भिमराव वाघचौरे यांच्या निवडीला स्थगिती देण्यास बीडच्या न्यायालयाने नकार दिला आहे. न्यायालयाच्या या निर्णयाने भाजपाला मोठा धक्का बसला असून डॉ. सारीका क्षिरसागर यांच्या गटाच्यावतीने रविंद्र कदम यांनी दाखल केलेला स्थगिती देण्याचा अर्ज ही न्यायालयाने फेटाळला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, बीड नगरपालिकेची पहिली सर्व साधारण सभा पिठासीन अधिकारी तथा नगराध्यक्ष श्रीमती प्रेमलताई पारवे यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी पार पडली. या सभेत उपनगराध्यक्ष व पाच स्वीकृत सदस्यांची निवड करण्यात आली. संख्या बाळाचा विचार करता शिव -शाहू -फुले- आंबेडकर- मौलाना आझाद बीड शहर विकास आघाडीचे दोन स्वीकृत सदस्य ,भाजपचे दोन व बीड शहर विकास आघाडी चा एक स्वीकृत सदस्य निवडून येणे अपेक्षित होते .तौलनिक पूर्णांक संख्या बळाचा विचार करून ,संख्या बळा नुसार शिव शाहू फुले आंबेडकर मौलाना आझाद बीड शहर विकास आघाडीचे दोन सदस्य सय्यद मोइनुद्दीन सय्यद बशीर, दिनेश हनुमान प्रसाद मुंदडा व भाजपचे एक सदस्य एडवोकेट गोविंद नवनाथ शिराळे तसेच बीड शहर विकास आघाडीचे खान मसूद उमर विजय घोषित करण्यात आले. त्यानंतर एक जागा शिल्लक असल्याने अपूर्णांकाच्या उतरत्या क्रमाने गुणांकन भारतीय जनता पार्टीचे ०.४१ शिव शाहु फुले आंबेडकर मौलाना आझाद बीड शहर विकास आघाडीचे ०.३५ व बीड शहर विकास आघाडीचे ०.२२ इतके होते. भारतीय जनता पार्टी व शिव शाहू फुले आंबेडकर मौलाना आझाद बीड शहर विकास आघाडी यांच्यातील तैलनिक अपूर्णांक संख्याबळ ०.६ इतका फरक होता, दोन्ही गटाकडून एक एक नाम निर्देशन पत्र भीमराव मरीबा वाघचौरे व रवींद्र कोंडीबा कदम यांचे असल्याने अनुभवाबाबत दोन्ही गटनेते यांच्या कडे पिठासीन अधिकारी यांनी विचारणा केली असता भीमराव मरीबा वाघचौरे यांना मागील २५ वर्षाचा नगरसेवक, सभापती, स्थायी समिती सदस्य, अनुभव असल्यामुळे त्यांना नगराध्यक्ष तथा पिठासन अधिकारी यांनी विजयी घोषित केले. यानंतर भीमराव मरीबा वाघचौरे यांच्या निवडीस त्यांचे प्रतिस्पर्धी रवींद्र कोंडीबा कदम यांनी बीड जिल्हा न्यायालयात आक्षेप दाखल केला असता, सदर प्रकरण दुसरे जिल्हा व सत्र न्यायाधीश मा.जयश्री पुलाटे मॅडम यांच्या समक्ष सुनावणीस निघाले असता, न्यायालयाने भीमराव मरीबा वाघचौरे यांच्या स्वीकृत सदस्यपदी निवडीस स्थगिती देण्यास स्पष्ट नकार दिला. माननीय बीड न्यायालयाच्या या निर्णययाने बीड भाजपाला व डॉ.सारिका सिरसागर यांच्या गटाला मोठा धक्का बसला आहे. स्वीकृत सदस्य भीमराव मरीबा वाघचौरे यांच्या वतीने एडवोकेट आनंद काशिनाथराव पाटील यांनी न्यायालयात प्रभावी बाजू मांडली. त्यांचे शिव शाहू फुले आंबेडकर मौलाना आझाद विकास आघाडीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

## नगर परिषद कार्यालयात स्व. अजितदादा पवार वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे धनंजय मुंडेंच्या हस्ते उद्घाटन

परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी

परळी वैद्यनाथ तालुका आरोग्यवर्धिनी समितीच्या माध्यमातून स्थानिक व बाहेरून येणाऱ्या रुग्णांची आरोग्यविषयक सर्व कामे सोडवली जावीत; कोणतेही डॉक्टर वेळेवर उपलब्ध होत



नाहीत किंवा सुट्टीच्या दिवशी अडचण असतील त्या अडचणी सर्व डॉक्टरांशी एकत्र बोलून आपण सोडवून घेऊ व सुट्टीच्या दिवशी देखील रुग्णांची गैरसोय होणार नाही, याबाबत प्रयत्न करू असे प्रतिपादन आ. धनंजय मुंडे यांनी केले.

परळी वैद्यनाथ नगर परिषदेच्या सभागृहात आरोग्यवर्धिनी समितीची बैठक आ. धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली संपन्न झाली, यावेळी ते बोलत होते. औषध फवारणी, लसीकरण याकडे विशेष लक्ष देण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. तसेच आरोग्यवर्धिनी समितीच्या माध्यमातून आरोग्यविषयक सेवा व रुग्णसेवा घडत असून रुग्णांच्या सोयीसाठी दर महिन्याला बैठक घेण्याचेही निर्देश धनंजय मुंडे यांनी यावेळी दिले. या बैठकीस नगराध्यक्षा सौ पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, उपनगराध्यक्ष प्रतिनिधी राजा खान, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. राऊत, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गुट्टे, तहसीलदार विनोद रणवारे, मुख्याधिकारी श्री निघळ यांसह सर्व सभापती, सर्वपक्षीय गटनेने, सर्व नगरसेवक आदी उपस्थित होते. नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई यांसह विविध नगरसेवकांनी आपले मत मांडले.

## डॉ. योगेश क्षीरसागर यांनी घेतल्या मंत्री पंकजा मुंडे, मंत्री मेघना बोर्डीकर यांच्या भेटी

बीड । प्रतिनिधी

बीड विधानसभा मतदारसंघातील विविध प्रलंबित प्रश्नांसाठी पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा भाजपच्या राष्ट्रीय सचिव ना.पंकजाताई मुंडे आणि ऊर्जा राज्यमंत्री ना.मेघनाताई बोर्डीकर यांची भाजप नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मंगळवारी (दि.४) मंत्रालयात भेट घेतली. या भेटीतून बीड मतदारसंघातील शहरी आणि ग्रामीण भागातील महत्वाचे प्रलंबित आणि प्रस्तावित विकासकामे मार्गी लागणार आहेत. बीड मतदारसंघातील प्रलंबित विकासकामांना गती मिळावी.





### बीड मतदारसंघात विविध ठिकाणी उभारणार ३३ केव्ही वीज उपकेंद्र

बीड विधानसभा मतदारसंघातील शहरासह ग्रामीण भागातील विजेचे अनेक प्रश्न डॉ.योगेश क्षीरसागर यांनी ऊर्जा राज्यमंत्री ना.मेघनाताई बोर्डीकर यांच्यासमोर मांडले. त्यांनी डॉ.क्षीरसागर यांच्या मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद देत बीड मतदारसंघात विविध ठिकाणी नवीन ३३ केव्ही उपकेंद्र उभारणार असल्याची ग्वाही दिली असून तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश ऊर्जा विभागातील वरिष्ठ अधिकारी तसेच बीड महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत.

तसेच शहर आणि ग्रामीण भागातील विविध विकास कामांसाठी भरीव निधीची तरतूद, विजेसह इतर प्रश्न मार्गी लागावेत आणि आवश्यक कामांसाठी शासनस्तरावर पाठपुरावा व्हावा, या अनुषंगाने डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मंत्री पंकजाताई मुंडे यांच्याशी चर्चा केली. याप्रसंगी नगरसेवक शुभम धूत, नवगण शिक्षण संस्थेचे संचालक आमेर सिद्दिकी, नितीन साखरे, समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष निखिल शिंदे, शुभम कातांगळे, दिलीप बेद्रे, सुशील जाधव, गोरख यादव आदींची उपस्थिती होती.

## मुख्यमंत्री मोफत महाआरोग्य शिबिरात अस्थिरोगांवर विशेष उपचारांची सुविधा

आष्टी । प्रतिनिधी

मुख्यमंत्री साहाय्यता निधी, धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष व जिल्हा प्रशासन, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त बुधवार, दि. ५ ऑगस्ट रोजी आष्टी येथे आमदार सुरेश अण्णा धस यांच्या संकल्पनेतून भव्य मुख्यमंत्री मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. राज्यातील सर्वात मोठ्या आरोग्य उपक्रमांपैकी एक ठरणाऱ्या या शिबिरात अस्थिरोगांसह विविध गंभीर आजारांवरील मोफत तपासणी, निदान व उपचारांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या महाआरोग्य शिबिरात विशेषतः गुडघेदुखी, खुबा बदलणे, कंबरदुखी, मानदुखी, मणक्याचे विकार तसेच नस दाबली जाण्याच्या आजारांवरील तज्ज्ञ तपासणी केली जाणार असून, आवश्यकतेनुसार एमआरआय, शस्त्रक्रिया व पुढील उपचार पूर्णपणे मोफत करण्यात येणार आहेत.

सुमारे ३४ एकर परिसरात उभारण्यात आलेल्या या भव्य आरोग्यनगरीत तज्ज्ञ



**गुडघा, कंबर, मान व मणक्याच्या विकारांवरील तपासणी, एमआरआय व शस्त्रक्रिया मोफत; प्रमुख उपस्थितीत अमृता देवेंद्रजी फडणवीस**

डॉक्टरांचे ८० प्रकारचे रुग्ण तपासणी कक्ष, स्वतंत्र नेत्र तपासणी विभाग, अत्याधुनिक डिजिटल एक्स-रे, विविध वैद्यकीय तपासण्या, औषधांचे मोफत वितरण तसेच आवश्यक त्या सर्व आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत काठी, वॉकर व चष्म्यांचेही वाटप करण्यात येणार आहे.

या महाआरोग्य शिबिराच्या प्रमुख उपस्थिती म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी सौ. अमृता देवेंद्रजी फडणवीस उपस्थित राहणार असून, त्यांच्या उपस्थितीमुळे या उपक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. ऊसतोड कामगार, हमाल, कांदा उत्पादक शेतकरी तसेच दिवसभर कष्टाची कामे करणाऱ्या नागरिकांमध्ये गुडघे, कंबर, मान व मणक्यांच्या व्याधी मोठ्या प्रमाणावर आढळतात. अशा रुग्णांना नामांकित तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करून आवश्यकतेनुसार पुढील उपचारांची संपूर्ण व्यवस्था या शिबिरातून करण्यात येणार असल्याने हजारो रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे. या महाआरोग्य शिबिरासाठी पद्मश्री डॉ. शेखर भोजराज, डॉ. मधुसूदन अग्रवाल यांच्यासह अजंठा फार्मा, संजीवनी ममता हॉस्पिटल (मुंबई), साईदीप हॉस्पिटल (अहिल्यानगर), विखे पाटील वैद्यकीय महाविद्यालय (अहिल्यानगर), वेलनेस हॉस्पिटल (बीड), तसेच केईएम हॉस्पिटल, जे. जे. हॉस्पिटल, ससून रुग्णालय आणि रुबी हॉल क्लिनिक, पुणे येथील तज्ज्ञ डॉक्टरांची टीम रुग्णांवर उपचार करणार आहे. या उपक्रमासाठी आत्तापर्यंत सुमारे ४० हजार रुग्णांची विविध आजारांनुसार नोंदणी व वैद्यकीय फाईल तयार करण्यात आली असून, शिबिर यशस्वी करण्यासाठी जवळपास पाच हजार कार्यकर्त्यांची फौज नियोजन, नोंदणी, रुग्ण मार्गदर्शन, तपासणी व उपचार प्रक्रियेत कार्यरत राहणार आहे. त्यामुळे हे शिबिर राज्यातील सर्वाधिक व्यापक आणि नियोजनबद्ध आरोग्य उपक्रम ठरणार असल्याचे बोलले जात आहे. गुडघा, कंबर, मान अथवा मणक्याच्या त्रासामुळे शस्त्रक्रियेबाबत कोणताही गैरसमज मनात न ठेवता सर्व रुग्णांनी या महाआरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. यावेळी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे राज्य समन्वयक डॉ. रितेश पाटील उपस्थित होते.

## खलिफा ए सौफी अहमदरजा उर्फअहमदरजा यांचे निधन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई येथील खलिफा ए सौफी ए हिंद पिरे तरीकेत हजरत अहमद उर्फ आरेफ बाबा यांचे वयाच्या ५७ व्या वर्षी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले, मराठवाडाभर, राज्य परराज्यात धार्मिक क्षेत्रातील आगळे वेगळे व्यक्तिमत्व



आसणारे तसेच ग्रामीण भागात जाऊन साधु संताचे विचार भाईचारा एकत्तेचा संदेश तळागाळातील जनतेपर्यंत पोहचविणारे आरेफबाबा दि. ३ ऑगस्ट सोमवारी संध्याकाळी साडेनऊ वाजता हृदयविकाराचा झटका आला त्यांच्या पश्चात दोन मुले दोन मुली आसुन मंगळवार ४ ऑगस्ट या दिवशी सायंकाळी पाच वाजता नमाजे जनाजा नुरानी मस्जिद गुरुवार पेठ येथे अदा करून एक मिनार मस्जिद पेन्शनपुरा येथे हजारोच्या उपस्थितीत दफनविधी करण्यात आला.

## माजलगाव नगरपरिषदेतील बनावट कागदपत्र प्रकरणाची मुख्यमंत्री फडवणीसांकडे तक्रार

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव नगरपरिषदेत बनावट कागदपत्रे, फेरफार, बनावट स्वाक्षऱ्या आणि प्रशासकीय गैरव्यवहार करून शासनाची व नागरिकांची दिशाभूल केल्याचा गंभीर आरोप करत पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे तालुका अध्यक्ष राकेश साळवे, विधानसभा अध्यक्ष सिद्धार्थ ससाने यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. या प्रकरणातील संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तातडीने फौजदारी गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात नगरपरिषदेतील लिपिक शिवहार शेटे, विघ्नेश मुंडे,आणि अक्षय धारक यांनी बनावट कागदपत्रे तयार करणे, खोट्या स्वाक्षऱ्या करणे, अभिलेखांमध्ये फेरफार करणे आणि शासनाची फसवणूक केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकारामुळे नगरपरिषदेच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून संबंधित प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करणे अत्यावश्यक असल्याचे निवेदनात नमूद आहे.

तक्रारीनुसार, बनावट प्रमाणपत्रे व दस्तऐवजांच्या आधारे प्रशासकीय निर्णय घेण्यात आल्याने नागरिकांची दिशाभूल



झाली असून शासनाची प्रतिमाही मलिन झाली आहे. अशा प्रकारच्या गैरप्रकारांना अभय देणाऱ्या अधिकाऱ्यांवरही कारवाई करावी, अन्यथा भ्रष्टाचाराला खतपाणी मिळेल, असा इशाराही देण्यात आला आहे. या संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ पातळीवर स्वतंत्र चौकशी करून दोषींना तात्काळ निलंबित करावे, भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमांनुसार फौजदारी गुन्हे दाखल करावेत तसेच शासनाचे झालेले नुकसान संबंधितांकडून वसूल करावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. नगरपरिषदेसारख्या सार्वजनिक संस्थेत जर बनावट कागदपत्रे तयार करून प्रशासनाची फसवणूक होत असेल, तर हा केवळ भ्रष्टाचार नसून जनतेच्या विश्वासाला तडा देणारा गंभीर प्रकार आहे. त्यामुळे या प्रकरणात शासनाने कोणतीही दिरंगाई न करता कठोर आणि उदाहरणार्थ कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.

## रचनात्मक कार्याचा अखंड प्रवास : आदर्श राजकारणी लोकनेते माजी आमदार भीमरावजी धोंडे



शिक्षण ही केवळ ज्ञान देणारी प्रक्रिया नसून सुसंस्कृत, संवेदनशील आणि राष्ट्राभिमानी नागरिक घडविण्याचे सर्वात प्रभावी माध्यम आहे. ''शिक्षण ही एक पवित्र संस्था आहे. तेथे माणसांची मने सुसंस्कृत होतात, उदात्त होतात,'' असे प्रतिपादन भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले होते. याच विचारधारेचा वारसा स्वीकारत आष्टीपाटोदाशिरूर मतदारसंघाचे लोकनेते, माजी आमदार भीमरावजी धोंडे यांनी आयुष्यभर शिक्षण, समाजकारण आणि विकास यांना सर्वोच्च प्राधान्य दिले.

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ग्रामीण भागात शिक्षणाची क्रांती घडवून आणली. त्यांचाच आदर्श डोळ्यासमोर ठेवून भीमरावजी धोंडे यांनी गोरगरीब, शेतकरी आणि सर्वसामान्य कुटुंबातील मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा ध्यास घेतला. शिक्षणाच्या माध्यमातून स्वावलंबी समाज निर्माण करण्याचा त्यांचा संकल्प आजही प्रेरणादायी ठरतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाला सामाजिक समतेचे प्रभावी शस्त्र मानले होते. या विचाराला प्रत्यक्ष कृतीची जोड देत धोंडेसाहेबांनी आष्टी तालुक्यासह परिसरातील गावागावांत प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा तसेच महाविद्यालयांची उभारणी केली. त्यामुळे ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी शहरांकडे धाव घ्यावी लागली नाही.

या शैक्षणिक कार्यातून असंख्य डॉक्टर, अभियंते, वकील, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सैनिक आणि पोलीस अधिकारी घडले. अनेक शेतकरी कुटुंबातील मुलांचे भविष्य उज्ज्वल झाले. शिक्षणाच्या माध्यमातून अनेक घरांमध्ये आर्थिक, सामाजिक आणि वैचारिक परिवर्तन घडून आले.

धोंडेसाहेबांनी केवळ शैक्षणिक संस्था उभारल्या नाहीत, तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासालाही तितकेच महत्त्व दिले. त्यांच्या संस्थांमध्ये भव्य क्रीडांगणे, व्यायामशाळा, सांस्कृतिक उपक्रम आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाची भक्कम परंपरा निर्माण झाली. या संस्थांमधून अनेक नामांकित खेळाडू, पैलवान, कलाकार आणि विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणारे विद्यार्थी घडले आहेत. ग्रामीण युवकांचे शारीरिक, मानसिक आणि सांस्कृतिक सक्षमीकरण करण्यामागे धोंडेसाहेबांचा दूरदृष्टीचा विचार स्पष्टपणे दिसून येतो.

राजकारणातही भीमरावजी धोंडे यांनी मूल्याधिष्ठित वाटचाल केली. लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्याशी त्यांनी अखेरपर्यंत निष्ठा राखली. मुंडे साहेबांच्या निधनानंतरही त्यांनी खासदार डॉ. प्रीतम मुंडे आणि माजी मंत्री पंकजा मुंडे यांच्या नेतृत्वाशी प्रामाणिक राहून संघटनात्मक जबाबदाऱ्या निष्ठेने पार पाडल्या. स्वार्थापेक्षा विचार आणि निष्ठेला त्यांनी नेहमीच अग्रक्रम दिला.

तीन-चार वेळा विधानसभेत प्रचंड मताधिक्याने निवडून येऊनही त्यांनी कधीही पद किंवा मंत्रीपदासाठी आग्रह धरला नाही. विकास हाच त्यांच्या राजकारणाचा केंद्रबिंदू राहिला. जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने झटणारा, सर्व जाती-धर्मांना समान न्याय देणारा आणि कार्यकर्त्यांना आपुलकीने सांभाळणारा नेता म्हणून त्यांनी वेगळी ओळख निर्माण केली.

आजही आष्टी, पाटोदा आणि शिरूर मतदारसंघातील प्रत्येक गावात भीमरावजी धोंडे यांचे नाव आदराने घेतले जाते. कारण त्यांनी राजकारणाला समाजसेवेचे माध्यम मानले आणि विकासाला लोककल्याणाची दिशा दिली. त्यांच्या कार्यातून अनेक पिढ्या घडल्या आणि हजारो कुटुंबांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडला.

माजी आमदार भीमरावजी धोंडे यांचा वाढदिवस हा त्यांच्या असंख्य कार्यकर्त्यांसाठी आणि सर्वसामान्य जनतेसाठी आनंदाचा उत्सव असतो. समाजासाठी सावली बनून उभे राहिलेल्या या लोकनेत्यांना निरोगी, दीर्घ आणि यशस्वी आयुष्य लाभावे, हीच सदिच्छा. लोकतंत्र परिवारातर्फे लोकनेते माजी आमदार भीमरावजी धोंडे यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!

**शरद रेडेकर, पत्रकार, आष्टी**





राज्य लोकतंत्र

# शेत-शिवार

बुधवार दि.५ ऑगस्ट २०२६





# जुलै महिन्यात अतिवृष्टी, ढगफुटी सदृश्य पावसाने झालेल्या नुकसानीपोटी सरकारकडून वाढीव मदत जाहीर

पुणे / प्रतिनिधी

जुलै २०२६ मध्ये अतिवृष्टी व ढगफुटी सदृश्य पावसामुळे झालेल्या नुकसानीची मदत देण्याकरिता राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. अतिवृष्टी व ढगफुटी सदृश्य पावसामुळे पूर येऊन घरांचे, कपड्यांचे, घरगुती भांडी, पशुधन तसेच दुकानदारांचे नुकसान झाले होते. यासाठी बाधित नागरिकांना विशेष बाब म्हणून वाढीव मदत देण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. ज्या ठिकाणी २४ तासांत किंवा २ ते ३ दिवसांत ५०० मिमी पेक्षा जास्त पाऊस पडून पूर परिस्थिती निर्माण झाली असेल अशावेळी विशेष बाब म्हणून मदत प्रदान करण्यात येते.

महाराष्ट्रातील काही बाधित नागरिकांना मदत देण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली २८ जुलै २०२६ रोजी बैठकीत निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार शासनाने मदत व पुनर्वसन विभागाने निर्णय जारी केला आहे. अल्प व अत्यल्प शेतकऱ्यांना मृत पशुधनासाठी प्रति जनावर ४० हजार रुपये, मेंढी-बकरीसाठी ४ हजार रुपये तसेच कुक्कुटपालन शेडच्या नुकसानीची भरपाई म्हणून ५ हजार इतकी वाढीव मदत देण्यात येणार आहे. यासाठी कपड्यांचे



नुकसान- प्रति कुटुंब १० हजार रुपये. घरगुती भांडी, वस्तूंचे नुकसान- प्रति कुटुंब १० हजार रुपये (४८ तासांपेक्षा अधिक कालावधीत क्षेत्र-घर पाण्यात बुडालेले असण्याची अट शिथिल). पूर्णतः नष्ट झालेल्या पक्क्या/कच्च्या घरांसाठी- प्रति घर १ लाख ५० हजार रुपये. अंशतः पडझड झालेल्या (किमान ५० टक्के पक्क्या) कच्च्या घरांसाठी- प्रति घर ५० हजार रुपये. अंशत पडझड झालेल्या (किमान १५ टक्के) कच्च्या/पक्क्या घरांसाठी- प्रति घर १५ हजार रुपये. नष्ट झालेल्या झोपड्यांसाठी- प्रति झोपडी १५ हजार रुपये. अल्प व अत्यल्प शेतकऱ्यांना मृत पशुधनासाठी मदत- दुधाळ जनावरे- प्रति जनावर ४० हजार रुपये. ओढकाम करणारी जनावरे- प्रति जनावर ३२ हजार रुपये. ओढकाम करणारी लहान जनावरे- प्रति जनावर - २० हजार रुपय. मेंढी/बकरी/डुकर- प्रति जनावर- ४ हजार रुपये. (कमाल ३ दुधाळ जनावरे किंवा कमाल ३ ओढकाम करणारी जनावरे किंवा कमाल ६ लहान ओढकाम करणारी जनावरे किंवा कमाल ३० लहान दुधाळ जनावरे प्रति कुटुंब या मर्यादेत मदत मिळणार). कुक्कुटपालन पक्षी- प्रति पक्षी १०० रुपये, अधिकतम १० हजार रुपये प्रति कुटुंब. मत्स्य बोटी व जाळ्यांसाठी अर्थसाह्य- बोटीचे अंशतः नुकसान- १० हजार रुपये. बोटीचे पूर्णतः नुकसान- २५ हजार रुपये. जाळ्यांचे अंशतः नुकसान- ५ हजार रुपये. जाळ्यांचे पूर्णतः नुकसान- ६ हजार रुपये. हस्तकला/ हातमाग, कारागीर, दुकानदार- प्रत्यक्ष नुकसानीच्या ७५ टक्के रक्कम किंवा जास्तीत जास्त ५० हजार रुपयांपर्यंत मदत. कुक्कुटपालन शेडचे नुकसान- ५ हजार रुपये. नुकसानीचे पंचनामा करण्यात आल्यानंतर लाभार्थी निश्चित करण्यात येतील. त्यानंतर तातडीने निधी वितरित केल्यानंतर रक्कम लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये हस्तांतरित करण्यात येणार असल्याचे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

# 'या' झाडांची पाने खाऊ घातल्यास शेळ्यांचे रोग होतात बरे

बहुतेक वेळा शेळ्या बाहेर चरायला गेल्यावर काही विशिष्ट झाडांचा किंवा वनस्पतीचा पाला खातात. शेळ्या आजारी पडल्या तर ते स्वतःला बरे करण्यासाठी झाडे किंवा वनस्पतींची पाने खातात. परंतु सध्या बहुतेक शेळीपालक शेळ्यांना बाहेर चरायला नेत नाही किंवा त्यांना शेळीपालन व्यवसायासाठी पुरेशी जागा सुद्धा नसते. अशा परिस्थितीत शेळ्यांना वेळोवेळी खाण्यासाठी अशा उपयुक्त झाडाची पाने द्यावीत. शेळ्यांना वेळोवेळी खाण्यासाठी झाडाची पाने द्यावीत. मोरिंगा, कडुनिंब, जामुन, बाईल आणि पेरूची पाने दिल्यास शेळ्यांना जास्त फायदा होईल. ही पाने शेळ्यांना अनेक रोगांपासून दूर ठेवतील.

हिरवा चारा हा दुभत्या जनावरांसाठी जीवनरक्षकापेक्षा कमी नाही. गाई, म्हशींबरोबरच शेळ्यांसाठीही हिरवे गवत आवश्यक असल्याचे जाणकार सांगतात. कारण त्यात अनेक औषधांचे गुणधर्म आढळतात. हे खाल्ल्यानंतर जनावरांची दूध देण्याची क्षमता वाढते. परंतु शेळ्यांसाठी गवतापेक्षा झाडांची पाने आणि वनस्पती अधिक फायदेशीर आहेत. पानांमध्ये असे घटक आणि औषधी गुणधर्म आढळतात, जे सेवन केल्याने शेळ्यांचे अनेक रोग आपोआप



बरे होतात. कारण झाडांची पाने शेळ्यांसाठी औषध म्हणून काम करतात.

पानांमध्ये टॅनिनचे प्रमाण आणि प्रथिने : वास्तविक, मोरिंगा म्हणजेच शेवग्याची पाने, कडुनिंब, जामुन, आणि पेरूच्या पानांमध्ये मुबलक प्रमाणात टॅनिन सामग्री आणि प्रथिने आढळतात, जे शेळ्यांसाठी खूप उपयुक्त आहेत. त्यांची पाने खाल्ल्याने शेळ्यांच्या पोटात जंत होत नाहीत. त्यामुळे शेळ्यांची वाढ झपाट्याने होते. त्यांचे वजनही झपाट्याने वाढते. शेळ्यांच्या पोटात जंत आल्यावर अनेक प्रकारचे आजार आपोआप उद्भवतात, असे तज्ज्ञ सांगतात. त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो.

शेळ्यांच्या मृत्यूचे प्रमाण कमी होते : कडुनिंब, पेरू, जामुन, मोरिंगा ही झाडे तुम्हाला सर्वत्र सहजासहजी दिसणार नाहीत. तरीही तुम्हाला काळजी करण्याची गरज नाही. सीआयआरजी अशा पानांपासून बनवलेले औषध बाजारात विकत आहे. ते खाल्ल्यानंतर फायदा होईल. त्याचबरोबर शेळीच्या करडांना कडुनिंबाची पाने खाऊ घातल्यास त्यांच्या शरीरातील रोगांशी लढण्याची शक्ती वाढते. हे खाल्ल्याने शेळीची करडे सहजासहजी आजारी पडत नाहीत. त्याचबरोबर शेळ्यांच्या मृत्यूचे प्रमाणही कमी होते. शेळीपालनातही सर्वाधिक नुकसान शेळ्यांच्या मृत्यूमुळे होते.

# कापूस पिकातील तणनियंत्रणासाठी तणनाशकांचा योग्य वापर

महाराष्ट्रात कापूस हे प्रमुख नगदी पीक असून चांगल्या उत्पादनासाठी तणनियंत्रण अत्यंत महत्त्वाचे आहे. पिकाच्या सुरुवातीच्या अवस्थेत तणांचा प्रादुर्भाव वाढल्यास कापसाच्या झाडांना पाणी, अन्नद्रव्ये आणि सूर्यप्रकाशासाठी स्पर्धा करावी लागते. परिणामी झाडांची वाढ खुंटते, बोंडांची संख्या कमी होते आणि उत्पादनात मोठी घट येऊ शकते. त्यामुळे योग्य वेळी आणि योग्य पद्धतीने तणनाशकांचा वापर करणे आवश्यक आहे.

तणनियंत्रण महत्त्वाचे : कापूस लागवडीनंतर पहिल्या ४५ ते ६० दिवसांचा कालावधी हा अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. या काळात तणांचा प्रादुर्भाव जास्त असल्यास उत्पादनावर थेट परिणाम होतो. अनेक शेतकरी मजूर उपलब्ध नसल्याने वेळेवर कोळपणी करू शकत नाहीत. अशावेळी योग्य तणनाशकांचा वापर केल्यास तणांचे नियंत्रण प्रभावीपणे करता येते आणि मजुरीचा खर्चही कमी होतो.

तणनाशकांची निवड : कापूस पिकात तणांचे प्रकार वेगवेगळे असतात. काही तणे गवतवर्गीय असतात तर काही रुंद पानांची असतात. त्यामुळे शेतातील तणांची ओळख करून त्यानुसार योग्य तणनाशकाची निवड करणे आवश्यक आहे. प्रत्येक तणनाशकाचे कार्य वेगळे असल्याने कृषी तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार आणि उत्पादनावरील अधिकृत लेबलवरील सूचनांनुसारच वापर करावा. एकाच प्रकारच्या तणनाशकाचा वारंवार वापर टाळल्यास तणांमध्ये प्रतिकारशक्ती निर्माण होण्याचा धोका कमी होतो.

योग्य वेळ महत्त्वाची : तणनाशकांचा परिणाम योग्य वेळेत वापरल्यासच चांगला मिळतो. तणे लहान अवस्थेत असताना नियंत्रण करणे अधिक प्रभावी ठरते. तणे मोठी झाल्यानंतर नियंत्रण कठीण होते आणि खर्चही वाढतो. पावसाचा अंदाज, जमिनीतील ओलावा आणि तणांची वाढ लक्षात घेऊन योग्य वेळ निवडणे गरजेचे आहे.

फवारणी करताना घ्यावयाची काळजी :



तणनाशक फवारणी करताना शिफारस केलेले प्रमाण, योग्य पाण्याचे प्रमाण आणि समसमान फवारणी याकडे विशेष लक्ष द्यावे. जोरदार वारा किंवा पावसाची शक्यता असताना फवारणी टाळावी. फवारणी करताना आवश्यक वैयक्तिक सुरक्षा साधनांचा वापर करावा आणि तणनाशक इतर पिकांवर उडणार नाही याची काळजी घ्यावी. उत्पादनाच्या लेबलवरील सूचना नेहमी पाळाव्यात.

एकात्मिक तणनियंत्रण अधिक फायदेशीर : फक्त रासायनिक तणनाशकांवर अवलंबून न राहता कोळपणी, आंतरमशागत, पीक फेरपालट आणि स्वच्छ शेत व्यवस्थापन यांचा वापर केल्यास तणांचे नियंत्रण अधिक प्रभावी होते. अशा एकात्मिक तणनियंत्रणामुळे उत्पादनात वाढ होते तसेच भविष्यातील तणांचा प्रादुर्भावही कमी होतो. कापूस पिकामध्ये वेळेवर आणि योग्य पद्धतीने तणनियंत्रण केल्यास उत्पादनात लक्षणीय वाढ होऊ शकते. योग्य तणनाशकाची निवड, योग्य वेळ, सुरक्षित फवारणी आणि एकात्मिक तणनियंत्रण या बाबींवर भर दिल्यास तणांचा प्रभाव कमी होऊन कापूस पिकाची वाढ अधिक जोमदार होते. त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याने नियोजनपूर्वक तणनियंत्रण करून उत्पादन खर्च कमी आणि उत्पन्न अधिक करण्याचा प्रयत्न करावा.

# धिंगरी अळिंबी : लागवड तंत्रज्ञान

अळिंबी म्हणजे ॲगरिकस प्रवर्गातील आहारात अन्न म्हणून उपयोगी विशिष्ट प्रकारच्या बुरशीचे फळ आहे. या बुरशीची पुर्ण वाढ झाल्यानंतर त्याला फळे येतात व त्या फळांस अळिंबी किंवा भुछत्र असे म्हणतात तसेच इंग्रजीत मशरुम या नावाने ओळखले जाते. निसर्गामध्ये अळिंबीचे विषारी व बिनविषारी तसेच विविध आकार व रंगानुसार असंख्य प्रकार आहेत. त्यामुळे त्याचा खाण्यासाठी वापर करण्यापुर्वी ह्या खाण्यास योग्य आहेत किंवा नाहीत याची खात्री करुनच खावेत. अख्या जगाचा विचार केला असता जगभरात अळिंबीचे २००० प्रकार असून, भारतात त्यापैकी २०० प्रकारांची नोंद केली आहे. अनेक शेतकरी शेतीला जोडधंदा म्हणून कमी भांडवलात कमी खर्चात कमी वेळेत अशी आहारात उपयुक्त ठरणारी धिंगरी अळिंबी उत्पादन करतात. ज्याला शास्त्रीय भाषेत ऑयस्टर म्हणतात. हा प्रकार अळिंबीच्या प्लुरोटस कुळातील आहे. ज्याला शिंपला किंवा पावसाळी छत्री या नावानेही ओळखले जाते.

धिंगरी अळिंबीस आहारात वैशिष्ठपुर्ण स्थान आहे. ओल्या धिंगरी अळिंबी मध्ये २.७८% प्रथिने, ०.६५% स्निग्ध पदार्थ, ५.२% कर्बादके, ०.९७% खनिजे, १.०८% तंतुमय पदार्थ, ९०% पाणी तसेच खनिंजांपैकी पालाश, स्फुरद, कॅल्शियम, लोह, सोडीयम इत्यादी घटक आहेत. जीवनसत्वापैकी ब-१, ब-२, आणि क यांचे प्रमाणही बऱ्याच भाजीपाला पेक्षा जास्त आहे. अळिंबीतील प्रथिनांमद्ये शरीरवाढीसाठी आवश्यक सर्व अमिनो आम्लांचा समावेश असून ती इतर भाजीपाल्यातील प्रथिनांपेक्षा उच्चप्रतिची पचनास हलकी असतात. अळिंबीमधील जीवनसत्व ब-२ मुळे शर्करायुक्त पदार्थांचे पचन रक्तवाहिन्यांचे आकुंचन कमी होणे



व लहान मुलांचा बेरीबेरी रोग नियंत्रणास मदत होते. क जीवनसत्वामुळे मुलांना स्कर्व्हीं रोग, नायसिन व पेटॅंथिनिक आम्लामुळे त्वचेचे रोग व हातपायांच्या तळव्यांची जळजळ कमी होण्यास मदत होते. अळिंबीमध्ये पिष्टमय पदार्थ व शर्करा अत्यल्प असल्याने रक्तदाब असणाऱ्यांना गुणकारी व आरोग्यवर्धक ठरते. यामधील विविध औषधी गुणधर्मामुळे प्रामुख्याने लठ्ठपणा, उच्चरक्तदाब, हृदयरोग, मधुमेह, कर्करोग, इन्फ्लुएझा, पोलिओ, एडस, दमा, फुफुसांचे रोग, वंधत्व विषाणूजन्य व जीवाणूजन्य रोग प्रतिबंधास विशेष उपयोग होतो.

धिंगरी अळिंबीच्या जाती व वैशिष्ट्ये : १) प्लुरोटस साजोर काजु - या जातीची फळे करड्या रंगाची असतात. ही जात म्हणजे तापमान व आर्द्रता फरकास प्रतिकारक्षम आहे. याला आवश्यक तापमान २०-३० से. व आर्द्रता ८०-९० से. लागते. या जातीची फळे शिंपल्याच्या आकाराची आकर्षक व चविष्ट असल्याने याला चांगली मागणी आहे. २) प्लुरोटस इओस : या जातीची फळे गुलाबी रंगाची असुन २०-२५ से. तापमान व ६५ ते ९० % आर्द्रता असलेल्या वातावरणात चांगली वाढू शकते. ही फळे फुलांच्या गुच्छाप्रमाणे दिसत असून शिजवल्यानंतर थोडी रबरासारखी चिवट लागतात.३) प्लुरोटस प्लोरीडा : या जातीची फळे आकाराने मोठी असुन गुच्छ पद्धतीने उगवते. या अळिंबीचा रंग पांढराशुभ्र असुन फळे काढणीस उशीर झाला तर फळे मऊ होवून काळसर पडतात. ४) प्लुरोटस फ्लॅबीलॅटस: या जातीचा आकार पंख्यासारखा असुन सुरुवातीला फळांचा रंग गुलाबी व नंतर पांढरा होतो. फळांचे देठ आखुड असुन फळे मऊ असतात. ५) हिपसीझायगस अलमॅरीस सुरुवातीला ह्या जातीची फळे निळ्या रंगाची असतात व नंतर फिक्कट होत जातात. फळे गुच्छ पद्धतीने असुन फळांना चांगली चव असल्याने बाजारात चांगली मागणी आहे.

धिंगरी अळिंबीच्या लागवडीची सुधारीत पद्धत : १) लागवडीसाठी जागेची निवड: धिंगरी अळिंबीच्या लागवडीसाठी अन्न, वारा, पाऊस यापासुन संरक्षण होईल अशा निवाऱ्याची गरज असते. पक्के किंवा कच्चे बांधकाम असलेली खोली किंवा शेड, अच्छादित असलेली झोपडी, बांबुच्या तट्ट्यापासुन तयार केलेली झोपडी किंवा पोल्ट्रीचे शेड वापरता येते. निवडलेल्या जागेस प्रखर सुर्यप्रकाश नसुन हवा खेळती राहील याची काळजी घ्यावी. २) लागवडीसाठी माध्यम: या अळिंबीची लागवड कुठल्याही पिष्टमय पदार्थ अधिक असणाऱ्या घटकांवर म्हणजे शेतातील पिकांच्या मळणीनंतर निरुपयोगी अश्या वाळलेल्या काडावर किंवा पालापाचोळ्यावर करता येते. यासाठी मुखतः भात, सोयाबीन, गव्हाचे काड, ज्वारी, बाजरी, मका याची व पाने, कणसे, भुईमुगाच्या शेगांची टरफले इत्यादींचा वापर करावा. ३) लागवडीसाठी वातावरण: लागवडीसाठी नैसर्गिक तापमान २२ ते ३० से. व हवेतील आर्द्रता ८५ ते ९०% असणे आवश्यक असते. म्हणून लागवडीच्या ठिकाणाचे तापमान व आर्द्रता यांचे नियंत्रण ठेवणेसाठी जमिनीवर तसेच हवेत चोहोबाजूंनी गोणपटाचे आवरण लावून त्यावर स्प्रे पंपाने पाणी फवारण्याची व्यवस्था करावी. साधारणः २५ से. तापमानास अळिंबीची वाढ होते. ४) लागवडीची पद्धत: लागवडीस लागणारे काड किंवा पालापाचोळ्याचे २-३ से.मी. लांबीचे बारीक तुकडे पोत्यामध्ये भरुन ६ ते ८ तास थंड पाण्यात बुडवून भिजत ठेवावे काडाचे पोते थंड पाण्यातुन काढुन त्यातील जास्त पाण्याचा निचरा करण्यासाठी १-२ तास तिवईवर ठेवावे.




## महत्वाच्या घटना

१५८३ : अमेरिका सर हम्फ्रे गिल्बर्ट यांनी उत्तर अमेरिकेत पहिली इंग्रजी वसाहत स्थापन केली

१८६१ : अमेरिकन सैन्यातील चाबकाचे फटके मारण्याची शिक्षा बंद करण्यात आली.

१९१४ : ओहायो मध्ये पहिले इलेक्ट्रिक ट्रॅफिक सिगनल बसवले.

१९६२ : कन्या नक्षत्रात पहिल्या 'क्वासार' तार्याचं अस्तित्त्व सिद्ध करण्यात यश

१९६२ : नेल्सन मंडेला यांना तुरुंगात टाकण्यात आले. यानंतर १९९० मधे त्यांची सुटका झाली.

१९६३ : शीतयुद्ध आंशिक आण्विक चाचणी बंदी करार: अमेरिका, युनायटेड किंगडम आणि सोव्हिएत युनियनने स्वाक्षरी केली.

१९६५: पाकिस्तानी सैन्याने साध्या वेषात घुसखोरी केल्यामुळे भारत पाकिस्तान युद्धाला सुरूवात झाली.

१९७३ : मार्स ६ अंतराळयान यूएसएसआर वरून प्रक्षेपित झाले.

१९९४ : इंडियन नॅशनल सायन्स ॲकेडमी तर्फे दिला जाणारा 'होमी जहांगीर भाभा पुरस्कार' राष्ट्रीय पदार्थविज्ञान प्रयोगशाळेले संचालक प्रा. इरोड सुब्रमणियन राजगोपाल यांना प्रदान

१९९७ : फ्रेन्च खुल्या लॉनटेनिस स्पर्धेत मिश्र दुहेरी गटात विजेतेपद मिळवणार्या महेश भूपतीला क्रीडा खात्यातर्फे २ लाख रुपयांचा पुरस्कार जाहीर

१९९७ : रशियाच्या दोन अंतराळवीरांना घेऊन 'सोयूझ-यू' हे अंतराळयान 'मीर' अंतराळस्थानकाकडे रवाना

२०१६ : ब्राझिलमधे रिओ-डी-जानिरो येथे ३१ व्या ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात होणार आहे.

२०१९ : भारत जम्मू आणि काश्मीर या परदेशाला राज्यचा विशेष दर्जा रद्द करण्यात आला आणि राज्याचे दोन केंद्रशासित प्रदेशांमध्ये जम्मू आणि काश्मीर, व लडाख असे विभाजन करण्यात आले.

२०२० : राम मंदिर, अयोध्या सर्वोच्च न्यायालयाच्या विवादित जमिनीवर मंदिर बांधण्याच्या बाजूने निकाल दिल्यानंतर भूमिपूजन करण्यात आले.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५० : फ्रेंच लघुकथाकार व लेखक गाय दी मोपासां यांचा जन्मदिन.

१८५२ : ब्रिटीश कालीन भारतातील उडीसा राज्यातील राष्ट्रवादी स्वातंत्रता सेनानी आचार्य प्यारे मोहन यांचा जन्मदिन.

१८५८ : वासुदेव वामन तथा 'वासुदेवशास्त्री' खरे इतिहासाचार्य, लेखक, नाटककार व कवी (मृत्यू: ११ जून १९२४)

१८९० : महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार इतिहासकार, लेखक, वक्ते आणि पुणे विद्यापीठाचे कुलगुरू १९६१-१९६४, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू १९४८, पद्मविभूषण, मराठी शुद्धलेखन महामंडळाचे अध्यक्ष, प्राचीन मराठी इतिहास आणि मराठ्यांचा इतिहास यांचे व्यासंगी (मृत्यू: ६ आक्टोबर १९७९)

१९०१ : भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे राजकारणी व मध्य प्रदेश राज्याचे माजी मुख्यमंत्री पं. द्वारका प्रसाद मिश्रा यांचा जन्मदिन.

१९१५ : पद्मश्री, पद्मभूषण, साहित्य अकादमी पुरस्कार, सन्मानित प्रख्यात हिंदी कवी व शिक्षणतज्ज्ञ शिवमंगल सिंग 'सुमन' यांचा जन्मदिन.

१९३० : नील आर्मस्ट्राँग चंद्रावर पाऊल ठेवलेला पहिला मानव (मृत्यू: २५ ऑगस्ट २०१२)

१९३३ : विजया राजाध्यक्ष लेखिका व समीक्षिका, ७४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा

१९४७ : साहित्य अकादमी पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय हिंदी भाषिक कवी वीरेन डंगवाल यांचा जन्मदिन.

१९५० : भारतीय वकील आणि राजकारणी महेंद्र कर्मा यांचा जन्म. (मृत्यू: २५ मे २०१३)

१९६९ : वेंकटेश प्रसाद जलदगती गोलंदाज

१९७२ : अकिब जावेद पाकिस्तानी जलदगती गोलंदाज

१९७५ : काजोल अभिनेत्री

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

८८२ : लुई (तिसरा) फ्रान्सचा राजा (जन्म:८६३)

१८९५ : जर्मन तत्त्ववेत्ता, इतिहासकार, साम्यवादी, सामाजिक शास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, पत्रकार आणि व्यवसायिक फ्रेडरिक एंगेल्स यांचे निधन.

१९५० : भारत रत्न पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय स्वतंत्रता सेनानी व आसाम राज्याचे पहिले मुख्यमंत्री गोपीनाथ बोरदोलोई यांचे निधन.

१९६२ : अमेरिकन अभिनेत्री मेरिलीन मन्रो यांनी गोळी झाडुन घेऊन आत्महत्या केली. (जन्म: १ जून १९२६)

१९८४ : रिचर्ड बर्टन अभिनेता (जन्म: १० नोव्हेंबर १९२५)

१९९१ : होंडा कंपनी चे स्थापक सुइचिरो होंडा यांचे निधन. (जन्म: १७ नोव्हेंबर १९०६)

१९९२ : अच्युतराव पटवर्धन स्वातंत्र्यसैनिक, ४२ च्या चळवळीतील अग्रणी नेते, भारतीय समाजवादी पक्षाचे एक संस्थापक, विचारवंत, तत्त्वचिंतक व सामाजिक कार्यकर्ते (जन्म: ५ फेब्रुवारी १९०५)

१९९७ : के. पी. आर. गोपालन स्वातंत्र्यसैनिक, कम्युनिस्ट व नक्षलवादी नेते (जन्म: )

२००० : लाला अमरनाथ भारद्वाज भारतीय क्रिकेटचे भीष्माचार्य, स्वतंत्र भारताच्या पहिल्या क्रिकेट संघाचे कर्णधार व स्वतंत्र भारताचे पहिले शतकवीर

२००१ : ज्योत्स्ना भोळे संगीत रंगभूमीला नवचैतन्य देणार्या गायिका आणि अभिनेत्री. संगीत नाटक अकादमी पुरस्कार (१९७६), विष्णूदास भावे पुरस्कार, बालगंधर्व पुरस्कार, महाराष्ट्र विशेष गौरव पुरस्कार, गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार इ. अनेक पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले. (जन्म: ११ मे १९१४)

२०१४ : भारतीय-इंग्रजी इतिहासकार चापमॅन पिंचर यांचे निधन. (जन्म: २९ मार्च १९१४)

# परीक्षा पद्धतीतील गैरप्रकारांविरुद्ध धरणे आंदोलन

जालना। प्रतिनिधी

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची पेपर फुटी, नीट , एम .एच. टी. सी. ई .टी.परीक्षा पद्धतीतील घोटाळा, निवड प्रक्रियेतील चुकीची पर्सेंटाइल पद्धती, शिक्षक पात्रता परीक्षा कायमची रद्द करावी तसेच निवड प्रक्रियेत ऑनलाईन परीक्षा पद्धती बंद करून ऑफलाइन परीक्षा घ्याव्यात,लॅटरल एन्ट्री ची घुसखोरी थांबवावी, एनसीईआरटीच्या पाठ्यपुस्तकांत वगळण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास आणि मराठा साम्राज्याचा नकाशा परत समावेश करावा आदी मागण्यांसाठी संभाजी ब्रिगेडने राज्यभरात एल्गार पुकारला असून सोमवारी ( ता .०३) प्रदेश कोषाध्यक्ष संतोष गाजरे पाटील यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले.

प्रा. सुदर्शन तारख, उपाध्यक्ष विजय वाढेकर, जिल्हाध्यक्ष कैलास खांडेभराड,




उपाध्यक्ष गिन्यानदेव जगताप,यांच्यासह पदाधिकारी, विद्यार्थी, पालकांनी मोठ्या संख्येने आंदोलनात सहभाग नोंदवला. जिल्हा प्रशासनामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवलेल्या लेखी निवेदनात म्हंटले आहे की, परीक्षा पद्धतीत सुरू असलेले गैरप्रकार, घोटाळे, पेपर फुटी यामुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये संतापाची लाट उसळली असून मानसिक दृष्ट्या खचलेल्या २० विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने औषध निरीक्षक पदासाठी घेतलेल्या परीक्षेपूर्वीच प्रश्न समाज माध्यमांवर व्हायरल झाले. या गंभीर प्रकरणाचा तपास करून मुख्यमंत्र्यांनी सत्य जनतेसमोर मांडावे, एम .एच. टी. सी.ई.टी परीक्षा घेण्याचे नियोजन खाजगी आस्थापनांना दिल्यामुळे सुरक्षा धोक्यात आली असून गुणवंत आणि मेहनत करणाऱ्या विद्यार्थ्यांवर अन्याय झाला आहे. सर्वोच्च न्यायालयाने गुणवत्ता वाढवणे आवश्यक असल्याचे निर्देश दिले असतांना शिक्षकांसाठी जाचक असलेली टि. ई. टी. परीक्षा रद्द करावी, बालवाडी ते पदवी पर्यंतचे शिक्षण मोफत आणि सक्तीचे करावे, लॅटरल एन्ट्री ची घुसखोरी थांबवून सर्व नियुक्त्या केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेमार्फतच देण्यात याव्यात, एनसीईआरटीच्या पाठ्यपुस्तकांत वगळण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास आणि मराठा साम्राज्याच्या नकाशाचा परत समावेश करावा, आदी मागण्यांचा समावेश आहे.

# पाथर्डीत एलसीबीची मावा अड्ड्यांवर धडक कारवाई



पाथड। प्रतिनिधी

पाथर्डी शहर व परिसरात प्रतिबंधित सुगंधी तंबाखू गुटखा आणि मावा विक्री तसेच उत्पादन करणाऱ्यांविरोधात अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेने रविवारी धडक कारवाई केली गुप्त माहितीच्या आधारे एकाच दिवशी तीन वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकून मावा विक्री व उत्पादनाचे अड्डे उद्ध्वस्त करण्यात आले या कारवाईत पाच जणांविरुद्ध पाथर्डी पोलीस ठाण्यात तीन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले असून चार जणांना अटक करण्यात आली आहे मुख्य आरोपींपैकी गणेश सुनील शिंदे (रा.कसबा पेठ पाथर्डी) हा फरार असून त्याचा शोध सुरू आहे पहिल्या कारवाईत नगर–बीड महामार्गावरील दीपाली टी परिसरातील पत्र्याच्या शेडवर छापा टाकण्यात आला यावेळी अंबादास गंगाधर गिरी (रा.अकोला ता.पाथर्डी) आणि आदित्य गणेश भस्करे (रा.पाथर्डी) हे प्रतिबंधित गुटखा व सुगंधी तंबाखूची विक्री करताना आढळून आले त्यांच्या ताब्यातून विविध प्रकारचा गुटखा पान मसाला सुगंधी तंबाखू तसेच इलेक्ट्रिक दुचाकी असा १ लाख १ हजार १८१ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला दुसऱ्या कारवाईत पाथर्डी–शेवगाव रस्त्यावरील बाबा पान शॉप परिसरात संतोष प्रताप ईधाटे ( नाथनगर पाथर्डी) याच्याकडून पाच किलो तयार मावा ९५ किलो सुगंधी तंबाखूमिश्रित सुपारीचा चुरा आणि मोबाईल असा ७७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला तिसरी आणि मोठी कारवाई २९ मैल परिसरातील निळवंडे रोडलगतच्या पत्र्याच्या शेडवर करण्यात आली तेथे ओंकार राजेंद्र उदारे (रा.कसबा पेठ पाथर्डी) हा इलेक्ट्रिक मशीनच्या साहाय्याने मावा तयार करताना आढळून आला चौकशीदरम्यान त्याने आपण गणेश सुनील शिंदे याच्याकडे कामाला असल्याचे सांगितल्याची माहिती आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेडकॉन्स्टेबल अभिजित अरकल अमोल आजबे राहुल डोके योगेश कर्डिले रमिझराजा अत्तार सतीश भवर रणजित जाधव आदींच्या पथकाने ही कारवाई केली स्थानिक गुन्हे शाखेच्या या कारवाईमुळे पाथर्डी शहर व तालुक्यातील अवैध मावा गुटखा आणि सुगंधी तंबाखू विक्री करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

# भास्कर आबा दानवे यांचा चर्मकार समाजाच्या वतीने सत्कार

जालना। प्रतिनिधी

जालना शहरातील संत शिरोमणी श्री रविदास महाराज स्मारकाचा प्रश्न मनपा च्या सर्वसाधारण सभेत उपस्थित केल्याबद्दल भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष श्री. भास्कर आबा दानवे यांचा चर्मकार समाजाच्या वतीने आज (दि. २ ऑगस्ट) चित्रकूट निवासस्थानी शाल व हार देऊन सत्कार करण्यात आला.

जालना शहरातील बालाजी चौक येथे संत शिरोमणी श्री रविदास महाराज यांच्या नावाने शहरात जागा उपलब्ध करून भव्य स्मारक उभारण्यात यावे तसेच परिसराचे सुशोभीकरण करण्यात यावे या मागणीसाठी चर्मकार समाजाने उपोषण केले होते. त्यावेळी भास्कर आबा दानवे यांनी आंदोलनस्थळी भेट देत समाजाच्या प्रतिनिधींशी चर्चा केली आणि महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत हा विषय मांडून मार्गी लावण्याचे



आश्वासन दिले होते. त्यांच्या मध्यस्थीनंतर आंदोलन मागे घेण्यात आले. भास्कर आबा दानवे यांनी जून महिन्यात झालेल्या महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत यांनी संत शिरोमणी श्री रविदास महाराज स्मारकासाठी जालना शहरात योग्य ठिकाणी जागा उपलब्ध करून देण्यात यावी आणि त्या परिसराचे सुशोभीकरण करण्यात यावे, अशी मागणी मनपा सभागृहात मांडली. समाजाच्या दीर्घकालीन मागणीला त्यांनी दिलेल्या पाठबळाची दखल घेत चर्मकार समाजाने त्यांचा सत्कार करून कृतज्ञता व्यक्त केली.

# बँक ऑफ महाराष्ट्राचे आडमुठे धोरण व हुकूमशाही नागरिकांच्या मुळावर

जालना। प्रतिनिधी

बँक ऑफ महाराष्ट्रच्या आष्टी शाखेत शेतकरी आणि शाखा व्यवस्थापक यांच्यात झालेल्या किरकोळ वादानंतर मागील चार दिवसांपासून शाखा बंद असून, शाखा तात्काळ सुरू करण्याच्या मागणीसाठी शेतकरी, व्यापारी व नागरिकांचे आमरण उपोषण सुरू आहे.

यावेळी आंदोलनकर्त्यांच्या वतीने बोलताना गजानन लोणीकर यांनी बँक प्रशासनावर गंभीर आरोप केले. ते म्हणाले की, शाखा बंद असल्यामुळे निराधार महिलांचे मानधन, वृद्धांचे पेन्शन, शेतकऱ्यांची पीककर्जाची कामे, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व्यवहार तसेच व्यापाऱ्यांचे आर्थिक व्यवहार ठप्प झाले आहेत. त्यामुळे हजारो खातेदारांची मोठी गैरसोय होत आहे. लोणीकर यांनी आरोप केला की, शाखा व्यवस्थापक आणि बँकेच्या मुख्य कार्यालयाने आडमुठे भूमिका घेत शाखा बंद ठेवली आहे. गेल्या अनेक वर्षांत रिझर्व्ह बँकेने दिलेली उद्दिष्टेही शाखेकडून पूर्ण करण्यात आलेली नाहीत. विविध सरकारांच्या शेतकरी कर्जमाफी



योजनांमुळे बँकेला आर्थिक लाभ झाला असतानाही शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी व सर्वसामान्य नागरिकांना अपेक्षित सेवा दिल्या जात नसल्याची टीकाही त्यांनी केली. याप्रकरणी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी (एसडीएम) व तहसीलदार यांना निवेदन देण्यात येणार असून, शाखा तात्काळ सुरू न झाल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल, असा इशारा गजानन लोणीकर यांनी दिला. दरम्यान, उपोषणाचा पहिला दिवस सुरू असून, शाखा तातडीने सुरू करून नागरिकांची गैरसोय दूर करावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांकडून करण्यात येत आहे.

## टीसी हरवला आहे

आदर्श देविदास चव्हाण या नावाचा दहावी पासचा टीसी बीड ते सिरसमार्ग प्रवासादरम्यान हरवला आहे कोणाला सापडल्यास खालील नंबर वर संपर्क साधावा.

**संपर्क**
**९४२१२७४१२७**

Daily Rajya Loktantra Date 05/08/2026

## PUBLIC NOTICE

CHANGE IN NAME

I HAVE CHANGE MY NAME FROM TASLEEM BEGUM RAIS QURESHI TO QURESHI TASLIM BEGUM RAIS HENCE FOR THE DECLERETION AND WILL BE KNOWN BY THIS NAME I WILL USE QURESHI TASLIM BEGUM RAIS IN FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY WIFE, CHILDREN AND FAMILY.“OLD NAME:- TASLEEM BEGUM RAIS QURESHI“NEW NAME:- QURESHI TASLIM BEGUM RAIS “ADDRESS- BARABHAI GALLI, AMBAJOGAI DIST BEED-431517

# माऊली संस्थान नारायणवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

शिरूर । प्रतिनिधी

वै.महंत विश्वंभर महाराज शास्त्री यांच्या ५ व्या पुण्यतिथी निमित्त व वै. महंत स्वामी निगमानंद महाराज यांच्या मूर्ती प्राणप्रतिष्ठा वर्धापन दिनानिमित्त प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी माऊली संस्थान नारायणवाडी येथे महंत जनार्दन महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवार दि. ७ ऑगस्ट पासून ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.





शिरूर कासार तालुक्यातील मौजे नारायणवाडी येथे वै.महंत विश्वंभर महाराज शास्त्री यांच्या संकल्पनेतून गेल्या ३७ वर्षापूर्वी श्री ज्ञानेश्वर महाराज (माऊली )संस्थानची उभारणी करण्यात आली आहे . या संस्थान वरती पंचक्रोशीतील विखूरलेल्या समाजाला,भाविक भक्तांना एकत्रित करून या ठिकाणाहून अध्यात्मिक ज्ञान अमृताचे प्रबोधन देता येईल व किर्तन प्रवचनाच्या माध्यमातून समाज जनजागृती ही करता येईल उदांत हेतू ठेवून महाराजांनी संस्थान वर्धापन दिनाच्या निमित्त करून या ठिकाणी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले होते. गेल्या पाच वर्षापासून महाराजांच्या पाश्चातही पुढे समस्त ग्रामस्थ नारायणवाडी, जोडवाडी, शास्त्रीनगर, भगवाननगर या ग्रामस्थांनी हा उपक्रम तिथी बदलून वै. विश्वंभर महाराज शास्त्री यांच्या पुण्यतिथी निमित्त व वै. महंत स्वामी निगमानंद महाराज यांच्या मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी महंत जनार्दन महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली अखंड चालू ठेवला आहे. या सप्ताह सोहळा शुक्रवार दि. ७ ऑगस्ट रोजी संत –महंत व पंचक्रोशीतील भाविक –भक्तांच्या उपस्थितीत आरंभीत होणार आहे. या सप्ताह दरम्यान काकडा भजन, विष्णुसहस्रनाम गीता पाठ , ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, प्रवचन, हरिपाठ, हरी किर्तन आदि कार्यक्रमाची रेलचल असणार आहे. यामुळे हा सोहळा म्हणजे पंचक्रोशीतील अध्यात्मिक पर्वनी असणार आहे तरी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन महंत जनार्दन महाराज यांच्यासह नारायणवाडी, जोडवाडी, शास्त्रीनगर, भगवान नगर येथील ग्रामस्थांनी केले आहे.

जाहिर प्रगटन

## तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३–२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि–११०९**
**दिनांक – ०४/०८/२०२६**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती गोविंद बाजीराव दराडे रा. राजुरेश्वर ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगी जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १. | वेदिका गोविंद दराडे | मुलगी | ०१/०४/२०१३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक–०४/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

जाहिर प्रगटन

## तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३–२७५०२७**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि–९३६**
**दिनांक – ०४/०८/२०२६**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती योगेश द्वारकादास जोशी रा. अंबड ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या बहिण जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १. | कल्पना द्वारकादास जोशी | बहिण | १४/११/१९६४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक–०४/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती एस. आर. पाटील, सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड यांच्या न्यायालयात,**
**किरकोळ दिवाणी अर्ज २४८/२०२६**
**भाऊसाहेब व इतर विरुध्द निरंक**
**मार्फत ॲड. एस. आर. नागरगोजे**

अर्जदार :– १. भाऊसाहेब आश्रु उर्फ आश्रुबा चौरे, रा. सोनेगाव ता. पाटोदा जि. बीड ह. मु. कांतीनगर, पाटोदा ता. पाटोदा जि. बीड, २. तुषार आश्रु उर्फ आश्रुबा चौरे रा. सोनेगाव ता. पाटोदा जि. बीड, ३. शहाबाई आश्रु उर्फ आश्रुबा चौरे, रा. सोनेगाव ता. पाटोदा जि. बीड ह. मु. कांतीनगर, पाटोदा ता. पाटोदा जि. बीड, ४. आरती महादेव भोरे रा. देवदैठण ता. जामखेड टू जि. अहमदनगर

विरूध्द कोणीही नाही

मागणी अर्ज:– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत..वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत आश्रु उर्फ आश्रुबा शामराव चौरे, हे रा. मौजे सोनगाव ता. पाटोदा जि. बीड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी आश्रु उर्फ आश्रुबा शामराव चौरे, यांचा मृत्यु दिनांक २८/०८/२०२३ रोजी सोनगाव ता. पाटोदा जि. बीड येथे मयत झालेले आहेत. तसेच मयताचे आई वडील यापुर्वीच मयत झालेले आहेत. अर्जदार क्र. १ व २ हे मयताचे मुले आहेत. अर्जदार नं ३ ही मयताची पत्नी असून अर्जदार नं ४ ही मयताची विवाहित मुलगी आहे.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत अथवा त्यांच्या व्यतिरीक्त इतर कोणी मयताचे वारस आहेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत आश्रु उर्फ आश्रुबा शामराव चौरे, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक ०३ ऑगस्ट २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १९ सप्टेंबर २०२६.

स्वाक्षरित
क. लि

आदेशावरुन,
स्वाक्षरित
सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय, क. स्तर, पाटोदा,
ता. पाटोदा, जि. बीड.

जाहिर प्रगटन

## तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३–२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि–९३६**
**दिनांक – ०४/०८/२०२६**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती योगेश द्वारकादास जोशी रा. अंबड ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगी जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १. | दुर्वा योगेश जोशी | मुलगी | २३/०९/२००४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक–०४/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

जाहिर प्रगटन

## तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३–२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि–११०८**
**दिनांक – ०४/०८/२०२६**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती गोविंद बाजीराव दराडे रा. राजुरेश्वर ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगा जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १. | वरद गोविंद दराडे | मुलगा | २४/०३/२०१९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक–०४/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

जाहिर प्रगटन

## तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३–२७५०२७**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि–८९१**
**दिनांक – १५/०७/२०२६**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती तुळसा भिमराव टकले रा. रोहिलागड ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वतः जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १. | तुळसा भिमराव टकले | स्वतः | २५/०७/१९७२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक–०४/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी**
**दंडाधिकारी, अंबड**

# क्रांतीसिंह नानासाहेब पाटील यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



जालना। प्रतिनिधी

थोर स्वातंत्र्यसेनानी क्रांतीसिंह नानासाहेब पाटील यांची जयंती जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, नायब तहसिलदार तुषार निकम, विक्रांत मोंढे, किशोर तायडे, सहाय्यक महसुल अधिकारी आदी कर्मचारी उपस्थित होते.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
बुधवार दि.०५ ऑगस्ट २०२६ | ६











































This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26